# महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित
# समाजश्री प्रशांतदादा हिरे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय नामपूर
# राज्यशास्त्र विभाग

## अहवाल.

**दिनांक: १० डिसेंबर २०२१**

महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित समाजश्री प्रशांतदादा हिरे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय नामपूर येथे राज्यशास्त्र व आय. क्यू. ए. सी. विभाग यांच्या वतीने **Electrol Literacy Club** ची स्थापना करण्यात आली.

यावेळी महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागाचे प्रा. ए. बी. वाघचौरे यांनी मतदार जनजागृती अभियान या विषयावर विद्यार्थ्यांना व्याख्यान दिले. अठरा वर्षे पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांनी मतदार नोंदणी करणे आवश्यक आहे असे प्रतिपादन त्यांनी केले. तसेच सुशिक्षित मतदारांची संख्या वाढल्यास लोकशाही अधिक बळकट होत जाईल, त्यामूळे विद्यार्थ्यांनी मतदार जनजागृती संदर्भात प्रबोधन केले पाहिजे असेही ते म्हणाले.

सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. यु. बी. कदम होते. त्यांनी मतदार नोंदणी झालेल्या विद्यार्थ्यांना मतदान प्रक्रियेत सहभागी होण्याचे आवाहन केले.

याप्रसंगी राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. एन. डी. पगार, आय. क्यू. ए. सी. विभागाचे प्रा. एम. आर. क्षीरसागर तसेच विद्यार्थी उपस्थित होते.



(प्रा. ए. बी. वाघचौरे यांनी मतदार जनजागृती अभियान या विषयावर विद्यार्थ्यांना व्याख्यान देतांना)